महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठासाठी, सहायक अनुदानाच्या जलद संवितरण व संनियंत्रणासाठी वित्त व लेखा अधिकारी, म.रा.कौ.विद्यापीठ यांना आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक (Virtual Personal Deposit Account Administrator) घोषित करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

शासन निर्णय क्रमांक : व्हिओसी-२०२४/प्र.क्र.६१/उद्योजकता,

मंत्रालय मुख्य इमारत (खोली क्र.२०४), २ रा मजला,

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ०१ ऑगस्ट, २०२४

वाचा -

१. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.११०/२०२३/कोषा प्रशा-५, दि. १४ फेब्रुवारी, २०२४
२. या विभागाचा शासन निर्णय क्र.कौविउ-२०२०/प्र.क्र.१३/उद्योजकता, दि. ३० मे, २०२२.
३. महालेखापाल (ले. व अ.) कार्यालयाचे क्र.TM/Ch.२/UOR no. ८२/कौ.रो.उ.व. ना.वि/२०२४-२५/५४०, दि.३१.०७.२०२४

प्रस्तावना -

संदर्भ क्र. १ येथील वित्त विभागाच्या शासन निर्णय दि. १४ फेब्रुवारी, २०२४ मधील परिच्छेद ११.१ अनुसार म.को.नि. नमुना क्रमांक ४४ देयकांद्वारे २७-लहान बांधकामे, ३१-सहायक अनुदान (वेतनेतर), ३३-अर्थसहाय्य, ३५- भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान, ५०-इतर खर्च, ५३-मोठी बांधकामे आणि वित्त विभागाद्वारे वेळोवेळी घोषित करण्यात येतील अशा अन्य उद्देश शीर्ष अंतर्गत राज्याच्या एकत्रित निधीतून आहरीत केल्या जाणाऱ्या सहायक अनुदानाच्या निधीचा विनियोग करण्यासाठी क्षेत्रिय आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना आणि अन्य अशासकीय कार्यान्वयन प्राधिकाऱ्यांना वित्त विभागाच्या सहमतीने 'आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक Virtual Personal Deposit Account Administrator (VPDAA) म्हणून घोषित करण्यासाठी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग सक्षम आहेत. त्यानुसार कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिनस्त महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी यांना आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक Virtual Personal Deposit Account Administrator (VPDAA) म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय -</u>

१. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकरिता, राज्याच्या एकत्रित निधीतून आहरित केल्या जाणाऱ्या लेखाशिर्ष २२५१ १०७६ ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) मधील निधीचा विनियोग करण्यासाठी, वित्त व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई यांना आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक Virtual Personal Deposit Account Administrator (VPDAA) म्हणून शासन निर्णयाद्वारे घोषित करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.१७६/२०२४/को.प्र.-५, दि.१५ जुलै, २०२४ व क्र.१८९/व्यय-६, दि. १८ जुलै, २०२४ अन्वये व महालेखापाल (ले. व अ.) कार्यालयाने क्र.TM/Ch.२/UOR no. ८२/कौ.रो.उ.व. ना.वि/२०२४-२५/५४०, दि.३१.०७.२०२४ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. संदर्भ क्र.१ येथील वित्त विभागाच्या शासन निर्णयामध्ये व संदर्भ क्र.३ येथील महालेखापाल (ले. व अ.) कार्यालयाच्या पत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्तींचे कटाक्षाने पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०८०११७००४९३३०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

MANJUSHA
AMIT KARANDE

Digitally signed by MANJUSHA AMIT KARANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILLS EMPLOYMENT ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=4b1c1c68b2fb7d60932c7a539658f299af288eb5fbe81ceb2178b5deea6f7a28, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6BC8432DE7E7323854E5E7499C63951988287A093EF9B088F4B029753EA90109, cn=MANJUSHA AMIT KARANDE
Date: 2024.08.01 17:15:25 +05'30'

(मंजुषा कारंडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव
५. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधान परिषद व संसद सदस्य

८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
९. सर्व सह सचिव/उप सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
१०.प्रधान महालेखापाल (लेखा व परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई
११.प्रधान महालेखापाल (लेखा व परिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१२.महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता-२, महाराष्ट्र, नागपूर
१४.आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई- ४०० ००२
१५.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हिल लाईन्स, नागपूर- ४४४ ००१
१६.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१७.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१८. आहरण व संवितरण अधिकारी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. कुलसचिव, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई.
२०.वित्त व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई.
२१.प्रादेशिक सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण पुणे/ नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती/ नागपूर
२२.संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई
२३.प्रादेशिक सह संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा, कोकण / पुणे/ नाशिक/छत्रपती संभाजीनगर / अमरावती/ नागपूर
२४.वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे / पुणे/ नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती/ नागपूर
२५.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२६.निवडनस्ती उद्योजकता